**श्री हरिहर सद्गुरु शक्तीपीठ**

श्रीरेणुकामाता मंदिर औरंगाबाद

जय हो जय श्री यतिराया आरती करू तुज गुरुवर्या ।

कृष्णानंदे, परमानंदे, भजनानंदे,

दिली दीक्षा तुज उजळाया, आरती करू तुज गुरुवर्या ||ध्रु ||

चरण-द्वय-मानस-तीर्थ, हंस हरी हृद मन चित्त ।

टळण्या जनन मरण खचित, सेवन ध्यान तुजे सतत ।

कमंडलुतुनी जान्हवी जननी, झुळू झुळू वहनी ।

पावन करी मम मन काया, आरती करू तुज गुरुवर्या ||१||

भस्मोद्धूलित तनु जाहली, जग धन लक्ष्मी कणी लपली ।

स्पर्श न कैसे पद-कमळी, पूजा अर्चनी दुरावली ।

अंतर पडले, नभ कोसळले, काहुर उठले ।

पसरु दे जगी तव निज मया । आरती करू तुज गुरुवर्या ||२||

स्निग्ध तेज ते तनुवरी, कांति मनोहर मनहारी ।

दिव्य तेज की चराचरी, प्रति चरण भू- गंध- भरी ।

त्रिताप जाती, मनी ये शांति पवन धरती ।

अघशमनी श्री यतिराया, आरती करू तुज गुरुवर्या ||३||

जगदोद्धारा अवतरण प्रशांत शीतल तपोवन ।

मुनिवर भूषण निरंजन, करुणार्णव शुचि दयाघन ।

सुख दे चित्ता, जगी तव सत्ता, आधार भक्ता ।

नम्र पदी नित रत सदया, आरती करू तुज गुरुवर्या ||४||